गीतारहस्य जयंती : दि. ३० मार्च १९७४

□

# गीताधर्म हा विश्वधर्म कसा ?

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, कराड

□

केसरी-मराठा संस्था, पुणें ३०

श्रीमद्भगवद्गीता हा सर्व उपनिषदांचे सार असणारा, तत्त्वज्ञानसंपन्न व नीतिपर असा प्रभावी संस्कृत ग्रंथ आहे. पाश्चात्त्यांना पौरत्स्य तत्त्वज्ञानाची गोडी लावणारा अद्वितीय ग्रंथ हाच. महाभारताच्या अंतर्गत गीताग्रंथ प्रकट झाला असून वैविध्यपूर्ण व वैचित्र्ययुक्त मानवी विश्वाचे प्रगल्भ विवेचन करणाऱ्या महाभारतात जी धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती विस्ताराने चितारली आहे, तिच्यातील जीवनाभ्यासाचे परिणत फल गीतेतील तत्त्वज्ञानाच्या रूपाने व्यासमहर्षींनी जगाच्या हाती दिले आहे.

या गीतेवर जी अनेकानेक टीकाभाष्ये झाली, त्यांत लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याला आगळे महत्त्व असून, श्रीमद्भगवद्गीता ही केवळ अध्यात्मविचार-संपदा नसून सर्वकालीन आचारसंहिता आहे, हे जनमनावर ठसविण्याची क्रांती गीतारहस्याने केली. वेदोपनिषदांपासून नासदीय सूक्तासुद्धा श्रीतुकारामरामदासादि साधुसंतांपर्यंत अध्यात्मज्ञानाच्या उज्ज्वल परंपरा टिकविणारी आचारसंहिता म्हणजे भगवद्गीता व तिच्यातील कर्मयोगशास्त्र. हें निदर्शनास आणून देण्याची कामगिरी करणारे लोकमान्य टिळक हे प्रभावी भाष्यकार व प्रबोधक आचार्य जन-मताने ठरले. उदात्तपणे संपन्न आणि " सर्वभूतहिते रत " असे आपले जीवन होण्या-साठी, माणसाला विवेक-वैराग्यांनी व्युत्पन्न अशा निष्ठेची कर्तव्यतत्परता हवी; हा श्रीमत्शंकराचार्य, ज्ञानेश्वरमाऊली व लो. टिळक या तीनही गीताभाष्य-कारांच्या प्रतिपादनांचा निष्कर्षाने दृढभाजक सांगता येईल. " मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः । सिद्ध्यसिध्योर्निर्विकारः कर्ता सात्विक उच्यते ।। " यावर सर्वच भाष्यकारांचा भर आहे.

लो. टिळकांनी आपल्या गीतारहस्य ग्रंथात गीतेचा अवतारकाल ख्रिस्ती शकापूर्वी पांचशे तरी वर्षांचा ठरविलेला आहे. श्री. ज. स. तथा तात्यासाहेब करंदी-करांसारख्या महाभारत-मग्न अभ्यासकाने गीतेचा काल शालिवाहनशकपूर्व २००९ वर्षांचा असल्याचे ज्योतिषशास्त्राधारे ठरविले आहे. काही झाले तरी, आजकालच्या विज्ञानसंशोधनाने प्रगतिपथावर असलेल्या राष्ट्रांच्या धर्मोदयापूर्वीच गीतोपदेश झाला हे तरी निर्विवाद आहे. हा गीतोपदेश कौरवपांडवांच्या संगरतांडवाच्या प्रारंभी, अर्जुनाच्या निमित्ताने सर्वच मानवांना झाला आहे याबद्दल दुमत नाही. समरप्रसंगी अस्वस्थचित्त झालेल्या आणि गोंधळलेल्या अर्जुनाला कर्तव्याकर्तव्याचा व्यामोह पडला असता, श्रीकृष्णासारख्या युगपुरुषाने तो उपदेश केला आहे. मानवी जीवनात कर्तव्याकर्तव्याच्या व्यामोहाचे प्रसंग नेहमीच उद्भवतात आणि त्यांचा विवेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरातील उज्ज्वलता सांभाळून व वर्तमानकालीन समाजाच्या उन्नत भवितव्याचा विचार करूनच, साधावा लागतो. कौरव-पांड-वांच्या युद्धप्रसंगी दोन्ही बाजूंची सैन्ये अठरा अक्षौहिणीएवढ्या प्रचंड संख्याबळाने जमली असता आणि ती युद्धाच्या खुमखुमीने जमली असता, पूर्वी अनेकानेक युद्धे मारलेला वीरश्रेष्ठ अर्जुन गांगरला, तो सामन्यास उभे राहिलेल्या आप्तस्वकीयांच्या

आणि गुरुजनांच्या संभाव्य संहाराच्या कल्पनेने नव्हे; तर आपल्या पांडवांच्या आणि सामनेवाल्या कौरवांच्या स्नेहसंबंधितांच्यासुद्धा पाच पिढ्यांचा संहार झाल्यावर भारतवर्षाचे काय व्हायचे या चिंतेनेच तो गांगरला होता. कारण भीष्म आजोबांपासून अर्जुनास नातवंडे शोभतील अशा उमद्या वीरवरापर्यंत सर्व युद्धकुशल त्या रणांगणावर ठाकले होते. तेव्हा " येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च । त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ।। " अशी वस्तुस्थिती अर्जुनाच्या लक्षात आल्यावर तो साहजिकच गांगरला ! एरवीं, कौरवांचा पुरा पाडाव करण्याचा त्याला आत्मविश्वासच होता. एवढेच नव्हे, तर कौरवांना विजयाचा आत्मविश्वास नसल्यामुळेच त्यांनी भारतातील सकस योद्धे पांडवांवर घालण्याकरिता गोळा केले होते. याची जाण अर्जुनाला असल्यामुळेच, " माझ्याबरोबर कोणाकडून लढत द्यावयाची आहे (कैर्मया सह योद्धव्यं ? ) " हे पाहण्यासाठीच, रणांगणावरील दोन सैन्यांमध्ये आपला रथ नेऊन उभा करण्यासाठी, अगदी प्रारंभी, अर्जुनाने श्रीकृष्णास सांगितले होते. त्या सैन्य-मध्यस्थ रथातून निरीक्षण केल्यावर, युद्ध जिंकण्याचा आत्मविश्वास असलेला अर्जुनही पाच पिढ्यांच्या संभाव्य संहारकल्पनेने गांगरला, युद्धविचारापासून मुरडला, आणि ? आणि, लोभाने बुद्धी नष्ट झालेल्या कौरवाना क्षत्रियांच्या कुलक्षयामुळे म्हणजे राष्ट्रातील संरक्षक सामर्थ्यांच्या संहारामुळे होणारी हानी व आपत्ती दिसत नसली, तरी आम्हा पांडवांना ती दिसते, तर जाणत्यांची जबाबदारी म्हणून ती आपत्ती टाळणे आमचे कर्तव्यच नाही काय ? अशी समस्या अर्जुनापुढे उभी राहिली. म्हणूनच क्षत्रियकुलक्षयामुळे, म्हणजेच संरक्षकशक्तीच्या अभावामुळे समाजस्वास्थ्य हादरते, सनातन कुलधर्म सुटू लागतात आणि ते सुटले म्हणजे कुळावर अधर्माचा ऊर्फ करू नये ते करीत बसण्याच्या वृत्तीचा पगडा बसतो; त्यामुळे कशी तरी वेळ निभावून नेण्याची प्रवृत्ती बळावते. " अगोदर जगू या तर खरे ! मग पाहता येईल उत्कट, भव्य, दिव्य जीवनाचा विवेक ! " असे माणसाला होऊन जाते. अशी धर्मभ्रष्टता वा व्रतशिथिलता बळावली तर पुढच्या पिढीवर वात्सल्याने संस्कार करीत राहण्याचे ज्यांचे अभिजात कर्तव्य त्या मायजातीच्याच मनांची घसरगुंडी होते. परिणामतः त्या घसरगुंडीतून कुलाचाराबद्दल दुष्टावाही कुलस्त्रियांच्या मनात निर्माण होतो. तसा झाला तर त्यांच्याकडून मिळणाऱ्या वा होणाऱ्या संस्कारातून एकीकडून कुलपरंपरांच्या अभिमानाची व दुसरीकडून प्राप्त परिस्थितीत नाईलाज म्हणून वेळ निभावून नेण्यातील व्रतशैथिल्याच्या अपरिहार्यतेची, अशा संमिश्र मनोवृत्तींची जोपासना होते. या संमिश्र मनोवृत्तीतील हलक्या थरांचाच आश्रय घेऊन वेळ निभावून नेण्याची सवय जसजशी प्रबळ होत जाते, तसतशी कुलपरंपरेतील " उत्कट, भव्य, दिव्य, उच्च, उदात्त, उजळे " सगळे बाजूस सरते आणि माणसातील तेजस्वीपणाची सगळी धूळधाण होते. या धूळधाणीमुळे माणसाचा व त्याच्या कुलपरंपरेचाही सत्यानाश होतो, तो शाश्वत स्वरूपाचाच होतो. असे ऐकत आल्याकारणाने, आपल्या हातून ते पातक घडू नये, या निश्चयाने

अर्जुनाचे मनच रणांगणातून पार मुरडले. त्याचा त्या मुरडण्यातील व्यामोह दूर करण्यासाठीच अर्जुनाला भगवान् कृष्णांनी उपदेश केला.

हा उपदेश, दोन्हीकडील सैन्ये युद्धाच्या खुमखुमीने एकसमयावच्छेदेकरून रणभूमीवर सरसावली असताना झाला. गुरुकुलातील गुरुशिष्यसंवादाच्या विचक्षणेने सातशेवर श्लोकांच्या अठरा अध्यायांनी तो उपदेश झाला. तो "गीता सुगीता कर्तव्या" एवढ्या प्रतिष्ठेचा ! तो तसा प्रत्यक्ष अक्षरशः झाला असेल, असे कौरवांच्या कुटिलतेचा परिचय असलेला कोणीही विचारवंत शक्य कोटीतील मानीत नाही. विषण्ण, धर्मसंमूढ व दिङ्मूढ अर्जुनाने गाण्डीव धनुष्य खाली ठेवताच, कदाचित् डोळे वटारूनच, श्रीकृष्णांनी त्याला युद्धप्रवृत्त केले असेल ! त्या अद्भुतरम्य प्रसंगाचे विशद शब्दचित्र भगवान् व्यासानी महाभारतात श्लोकबद्ध करून ठेवले, असाच कित्येक अभ्यासूंचा विश्वास आहे. अभ्यासकांचे असेही एक मत प्रसिद्ध आहे की मूळ गीता पाच अध्यायांच्या अखेर वास्तविक संपते आणि सहाव्या अध्यायापासून तत्कालीन तत्त्वज्ञानाचे जे प्रचलित पंथ होते, त्यांचे सहकारसमन्वयाने संकलन साधलेले आहे. त्या एवंगुणविशिष्ट गीतोपदेशातून, समष्टिदृष्टचा पूर्ण विचारा ती करावयाचेच म्हणून ठरविलेले युद्ध क्षात्रधर्मोचित व अपरिहार्य कर्तव्यच आहे, एवढे कृष्णांनी अर्जुनाला पटवून दिल्यानंतर, व्यासांनी त्याचे जे उद्बोधन केले आहे, त्यातून "कर्मयोगो विशिष्यते ।" हाच ठसा अभ्यासकांच्या मेंदूवर अमरपणे उमटतो. त्यातूनच समाजाची सुव्यवस्था रहावी, त्याची प्रगति प्रवाही होत राहणे शक्य व्हावे, आणि मनुष्यमात्राच्या मोक्षप्राप्तीस अडथळा म्हणून येऊ नये, यासाठी प्राप्त कर्तव्या-कर्तव्य ठरविण्यास गीतेचे कर्मयोगशास्त्र (नीतिशास्त्र) म्हणजे अध्यात्माधिष्ठित कर्तव्य-पालनाची कसोटी हीच उपयुक्त ठरते. या कसोटीचीच महती लोकमान्यांनी सविस्तर बुद्धिवादाने गीतारहस्यात विशद करून सांगितली आहे.

कुरुक्षेत्रावरील कौरव-पांडवांचे युद्ध हे अन्यायाच्या प्रतिकारार्थ करावयाचे, असे पांडवांनी ठरविले होते. सुईच्या अग्रावरील मातीइतकाही पांडवांचा राज्यावरील हक्क कौरवांनी मान्य केला नाही, या मग्रूर अन्यायाच्या प्रतिकारार्थ ते युद्ध होते. म्हणूनच "धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ।" असे श्रीकृष्णांनी अर्जुनास बजावले. प्राणावर व संपत्तीवर पाणी सोडून आलेल्या व युद्धाची खुमखुमी असलेल्या पट्टीच्या वीर-वरांच्यामुळे, अर्जुन भीत होता तशा घनघोर युद्धपरिणामांच्या अनर्थकारी भीषणतेचा संभव श्रीकृष्णांनासुद्धा अमान्य नव्हता. पण राजकारणाच्या अन्ती "कारणासह रण" अपरिहार्यच ठरल्यावर, त्या रणांगणातून माघार व तीही अन्यायाचा प्रतिकार वा लोप न होताच, घेणे हे समाजाच्या व राष्ट्राच्या अधिक अहिताचेच नव्हे, तर घाताचे ठरणार ! युद्धोत्तर संरक्षकशक्ती नाहीशी झाल्यामुळे, सनातन कुलधर्माचा लोप होऊन, संमिश्र वा संकरित मनोवृत्तीतील सुखरूपतेच्या ध्यानाने हलक्या व बिनजबाबदार थरांना महत्त्व मिळेल आणि समाजातील रसरशीतपणा व तेजस्वीपणा लुप्त होईलही !! तथापि तो घडलाच तर

युद्धोत्तर परिणाम आहे. पण, अन्यायाच्या प्रतिकारासाठी उभ्या केलेल्या युद्धातून, अन्यायाचे निराकरण न होताच, नेते जर आयत्या वेळी माघार घेऊ लागले, तर युद्धोत्तर अनर्थापेक्षाही, युद्धातील माघारीने होणारा अनर्थ पौरुषविडंबनासह सर्वथा घातक ठरेल. कारण, "यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।।" असा अनुभव असल्याकारणाने, युद्धातून माघार घेणाऱ्या पुढाऱ्यांच्या योगाने सर्व समाज, सर्व राष्ट्र "असुनि जिवंतहि मेले" होईल; कोणाचा पायपोस कोणाच्या पायात उरणार नाही, आणि सगळ्या समाजाची व राष्ट्राची बैठकच उठून जाईल, उद्ध्वस्त होईल. श्रीकृष्णांनी आपल्या पुढारीपणाकडे विनम्र-भाव घेऊनसुद्धा, आपण प्राप्त कर्तव्य करीत न राहिल्यास आपल्या अनुयायांची स्थिती वरीलप्रमाणे होईल, असा विवेक सांगून, "शितावरून भाताची परीक्षा" या न्यायाने, अर्जुनास विवेकप्रवृत्त केले आहे. अर्जुनाने युद्धोत्तर परिणामांचा मांड मांडल्यानंतर, श्रीकृष्णांनी त्याला लागलीच ठणकाविले होते की, "क्लीबत्वाप्रति ना जाई पार्थ हे न तुझ्याकडे !" त्यातील मर्म श्रीकृष्णांनी अर्जुनास स्वतः व स्वतःच्या अनुयायांच्या उदाहरणाने सुचविले. आपल्या अनुयायांना "असुनि जिवंतहि मेल्या-" सारखी स्थिती आणण्याने व त्यांचे स्वास्थ नाहीसे करून त्यांची मनोवृत्ती संकरित करण्यात जो गप्पागोंधळ होईल, तो अनर्थाचा अनर्थ ठरेल. म्हणून जनकादिक युग-पुरुषांनी जो कर्मयोगाचा मार्ग पत्करला, तोच अनुसरत राहणे स्वतःच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या शाश्वत कल्याणास उपयुक्त आहे, असे श्रीकृष्णांनी स्पष्ट केले आहे.

गीतेत श्रीकृष्णांनी अर्जुनास जो उपदेश केला आहे, त्यात कर्मसंन्यास आणि क्लैव्य यांचा अवलंब निषेधिला आहे. विवेकनिश्चित कर्तव्यकर्म कौशल्यपूर्ण करून दुष्टदण्डन व साधुपरित्राण करावे; आणि समाजाच्या, राष्ट्राच्या, मानवजातीच्या ऐहिक सुखाभिवृद्धीचे कार्य सामाजिक, राष्ट्रीय, मानवी शीलशुद्धी शाबूत राखून साधत रहावे, हे सर्व करताना जलाशयात तरंगणाऱ्या पण पाण्याच्या एकाही थेंबाला स्वतःमध्ये शिरू न देणाऱ्या नावेप्रमाणे माणसाने आपले जीवन सेवाभावी ठेवावे, हे आहे गीतातत्त्वज्ञानाचे थोडक्यात स्वरूप. शातवाहनादिकांपासून भारतीय इति-हासाचे सिंहावलोकन करणाऱ्या चिनी व पाश्चात्त्य प्रवाशांनीहि वर उल्लेखलेले गीतातत्त्वज्ञान हेच भारताचे जीवनतत्त्वज्ञान असल्याचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष मान्य केले आहे. गीतापूर्वकालीन समाज विजिगीषु, प्रवृत्तिपर व पराक्रमी होता, हे "जय-नामेतितहासोऽयं श्रोतव्यो विजगीषुणा ।" या वचनावरूनही स्पष्ट आहे. म्हणून गीतेने कर्म म्हणजे प्राणिमात्रांची यच्चयावत् हालचाल अशी व्यापक व्याख्या ठर-विली. या जगात प्रत्येक जणच आपले अस्तित्व, वैशिष्टय, नैसर्गिक गुणसंपदा व्यक्त करणारा असाच असणार. अशा या अस्तित्वाभिव्यक्ति करणाऱ्या विविध, विचित्र व कल्पनेस गम्यागम्य "भवसागरातून" तरून जाऊन जगच्चैतन्याशी समरूप होऊन रहावयाचे; एवढा पल्ला जीवनात यशस्वीपणे चालून जावयाचा तर कोणीही क्षण-भरसुद्धा कर्तव्यकर्माशिवाय राहूच शकत नाही. साध्या शरीरधारणेचा व्यापारही

कर्माशिवाय चालत नाही. परस्परसहकाराने, निदान अविरोधाने, परस्परांबद्दल आदर, आदब व आपुलकी राखून सर्व जीवनभर असेच चालले पाहिजे की शहाण्या-तल्या शहाण्यानेसुद्धा अनासक्त बुद्धीने म्हणजेच समाजसेवासमर्पण-बुद्धीने यज्ञमय सृष्टिचक्र सातत्याने चालविण्याची जबाबदारी घेतली व पार पाडली पाहिजे. गीतेच्या तिसऱ्या अध्यायाचा कटाक्ष हीच गोष्ट निक्षून सांगण्यावर आहे.

भारतीयच काय, पण जागतिक तत्त्वज्ञानात गीतेची प्रतिष्ठा सर्वोच्च असून गीतेचे विवेचन सर्वश्रेष्ठपणे बुद्धिग्राह्य आहे. युद्ध असो वा कोणतेही विवेकनिश्चित प्राप्तकर्तव्य असो, त्याच्या परिणामांची जबाबदारी कर्तव्यनिष्ठाच्या हेतूवरून, प्रेरणे-वरून, निश्चितार्थावरून ठरवावी लागते व गीता तसेच करते. प्रयत्नांती परमेश्वर या न्यायाने विवेकनिश्चित कर्तव्य पार पडल्यावर, त्याचे परिणाम समाजजीव-नाच्या दृष्टीने हितकरच व्हावेत, अशी दक्षता घेत घेत फलप्राप्ती – अथवा प्रसंग-विशेषी फलसंनिपात – यापासून मनुष्य सर्वस्वी अलिप्तच राहिला, तर त्याचा तो निष्काम कर्मयोग त्याला सर्व कर्मबंधनांपासून मुक्तच ठेवीत असतो. (गीता १८।११). व्यक्तीच्या दृष्टीने हे जसे उदात्त व उन्नत, तसेच व्यक्तिव्यक्तींच्या परस्परातील आपुलकीने आणि " उणे पडू देऊ नये कोणी एकाचे ।" या सहकारसंभावनेने, समाज व राष्ट्र सामर्थ्यसंपन्न व प्रगतपणे वैभवसंपन्न होत जाण्यावरही अढळ लक्ष ठेवावेच लागते. ( गीता ३।११). वैयक्तिक जीवनाला " लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुम-र्हसि । " हा आदेश समाजसेवाबुद्धीनेच आहे. समाजसेवाबुद्धीने कर्तव्यकर्म इतक्या दक्षतेने करावयाचे असते की " अचूक चुकेना कोठे । त्याची राज्ये समस्त ही । " असे झाले पाहिजे. " सिद्धिर्भवति कर्मजा " म्हणजे " केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।। " अर्थात् यशस्वीच यशस्वी व्हावयाच्या कर्तव्यकर्माकर्मातील बारीकसारीक भागविभागातूनहि आवश्यक ते कौशल्य व आवश्यक ते परिश्रम इतक्या बेतशीर खर्च केलेले असले पाहिजेत की त्या सर्व भागविभागांची एकजिनसी पूर्णता चोहोबाजूंनी वर्णन करण्यासारखीच व्हावी. " चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।" असे समाधान कर्त्याला लाभले पाहिजे आणि तरीही मनुष्याने कर्तेपणाच्या अभि-मानाचे वारेही स्वतःला लागून घेऊ नये. हे स्वतःच्या उदाहरणाने श्रीकृष्णांनी सूचित केले आहे. समाजसेवाबुद्धीने सिद्धीप्रत न्यावयाचे कर्तव्यकर्म " परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय " घडावे. असे परमेश्वरी अधिष्ठान सांभाळण्यानेच निष्काम कर्मयोग व्यवहारशुद्ध व शास्त्रशुद्ध होतो. संसार समर्थपणे करून तो ऐहिक फलदायी व मोक्षदायी व्हावा, यासाठी गीतेने हा राजमार्ग आखून दिला आहे. सर्व टीकाभाष्ये बाजूला सारून स्वतंत्रपणे चिंतनपूर्वक गीताभ्यास केल्या-वर, लो. टिळकांना हा निष्काम कर्मयोगच गीताप्रतिपादनाचा निष्कर्ष म्हणून प्रतीत झाला आणि त्यांनी तो सेवासमर्पणबुद्धीनेच गीतारहस्य म्हणून पुढीलांचे हाती ग्रंथरूपाने दिला.

गीतेतील बुद्धिग्राह्य तत्त्वज्ञानामुळेच गीतेवर अमाप टीका व भाष्ये झाली

असून भारतातील कोणत्याही धर्मसांप्रदायाला गीताश्रयावाचून पूर्णता आल्याचे समाधान लाभत नाही. समाजाच्या ऐहिक कल्याणातच सेवाभावी व्यक्तींचा परमार्थ सिद्ध व्हावा असा गीतेचा संकेत स्पष्ट दिसतो. म्हणून गीता जशी कर्मवादी आहे, तशीच आनंदवादी असून राज्यसंस्था किंवा समाजसंस्था जेव्हा न्यायी व कर्तव्यदक्ष असतात, तेव्हाच तेथे " सर्व सुखाचे आगर " ऊर्फ स्वर्ग निर्माण होतो, असा गीता-प्रतिपादनाचा रोख असल्याकारणाने गीतेचा आनंदवाद वास्तवातील " धृत्युत्साह-समन्वित " आहे.

म्हणून वैदिकधर्मीयांइतकीच गीता इतरधर्मीयांसहि प्रिय झाली आहे. वैदिक धर्मातील कर्मकाण्डाविरुद्ध बंड उभारून बौद्धधर्म अवतरला, त्यातील तत्त्व-ज्ञानाने भारावलेल्या मनोवृत्तीतून ख्रिस्ताचा धर्म निर्माण झाला असे विवेकानंदांनी म्हटले आहे. या सर्वांच्या गोड गोपाळकाल्यातून महंमदी धर्म स्वरूप धारण करून बसला, असा जागतिक धर्मांचा इतिहास सांगत बसण्याचा अट्टाहास काही काही ठिकाणी आढळतो. तो बरोबर, चुकीचा काहीही ठरले तरी वैदिक धर्माचे उपनिषद, गीता आणि ख्रिस्ती धर्माचा प्रमाणग्रंथ बायबल एकच आहेत, असे जगाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न अनेकानेक वर्षे चालू असून बायबलवरून गीता उतरली असे सिद्ध करण्याच्या फंदात पाश्चिमात्य होते. ते गाडे सर्व उलटून गीतेवरूनच बायबल तयार झाले, असा आता उलटा ओघ सुरू झाला आहे. गीते-संबंधी टीकात्मक वाङमय जसे अलोट आहे तसेच बायबलासंबंधीही आहे. त्यांच्या अभ्यासातून, असले तर बायबलच गीतेचे प्रतिबिंब असू शकेल, अशी मात होऊ लागल्यावर गीताधर्म हाच विश्वधर्म अशी विचारधारा आता स्थिर पायावर धर धरू लागली आहे. या संबंधातील ऐतिहासिक ओघ आणि दृष्टी मननीय असून मार्मिकपणे समजून घेणे नुसते उचितच नव्हे, तर आवश्यक होऊन बसले आहे.

लो. टिळकांनी गीतारहस्याच्या परिशिष्ट भाग ७ मध्ये म्हटले आहे की, " हिंदुस्थानात भक्तिपर भागवतधर्माचा उदय ख्रिस्तापूर्वी सुमारे चवदा शतके झाला होता, आणि ख्रिस्तापूर्वी निघालेल्या मूळच्या संन्यासपर बौद्धधर्मात प्रवृत्तिपर भक्तितत्त्वांचा प्रवेश होण्यास बौद्ध ग्रंथकारांच्या मतेच श्रीकृष्णप्रणीत गीता कारण झालेली आहे. . .गीतेतील बरेच सिद्धान्त ख्रिस्ती बायबलात आढळून येतात. १८६९ साली प्रसिद्ध केलेल्या गीतेच्या जर्मन भाषांतरग्रंथात (डॉ.) लॉरेन्सर यांनी भगवद्गीता व बायबल यातील शब्दसादृश्याची स्थळे दाखविली असून, त्यापैकी काही विलक्षण आणि मनन करण्यासारखी आहेत. उदाहरणार्थ (जॉन १४.२०) हे वाक्य (गीता ४.३५) आणि (गीता ६.३०) या वाक्याशी समानार्थकच नव्हे, तर शब्दशःही एकच आहे असे म्हणावयास हरकत नाही. यहुदी भाषेत देवास 'इलोहा' (अरबी 'इलाह') असे म्हणतात. पण मोझेस याने घालून दिलेल्या नियमा-प्रमाणे यहुदी धर्मातील जे मुख्य दैवत त्यास 'जिहोव्हा' अशी विशिष्ट संज्ञा आहे. 'जिहोव्हा' हा शब्द मूळ यहुदी नसून खाल्दी भाषेतील 'यव्हे' (संस्कृत यह) या शब्दा-

पासून निघाला आहे, असे पाश्चिमात्य पंडितांनीच ठरविले आहे. वैदिक धर्मातील कर्मकाण्डाप्रमाणे यहुदी धर्मही यज्ञमय व प्रवृत्तिपर आहे. उलटपक्षी (माथ्यू ९. १३, ६. ३४; १९,३१) संन्यासधर्माचे नियम पाळण्यास ख्रिस्ताने सांगितले आहे. ख्रिस्तचरित्र व ख्रिस्ताचा उपदेश यांचेही बुद्धाच्या धर्माशी विलक्षण साम्य आहे, असे बौद्ध धर्मग्रंथ आणि बायबलचा नवा करार यांची तुलना केली असता स्पष्ट दिसून येते. . .भक्तीचे तत्त्व मूळ बौद्ध धर्मात नव्हते. पण तेही पुढे म्हणजे ख्रिस्ताच्या पूर्वीच निदान दोन-तीन शतके महायान बौद्ध पंथात भगवद्गीतेवरून शिरलेले होते. शेकडो लहानमोठ्या बाबतीत ख्रिस्ती व बौद्ध धर्मात साम्य आहे, असे मि. आर्थर लिली यांनी आपल्या पुस्तकात साधार व्यक्त करून दाखविले आहे. किंबहुना ख्रिस्ती लोकांस पवित्र व पूज्य झालेली 'क्रूसा'ची खूणही 'स्वस्तिक' या रूपाने वैदिक व बौद्ध धर्मातील लोक ख्रिस्तापूर्वी शेकडो वर्षे शुभदायक मानीत होते, आणि इजिप्त वगैरे पृथ्वीच्या जुन्या खंडातील देशातच नव्हे, तर कोलंबसापूर्वी काही शतके अमेरिकेतील पेरू व मेक्सिको देशातही स्वस्तिक चिन्ह शुभावह मानले जात होते. (The secret of the Pacific by C. Reginald Enock पहा.) बौद्ध भिक्षु आणि जुने ख्रिस्ती धर्मोपदेशक यांच्या पोषाकात व धर्मविधीतहि पुष्कळ साम्य आहे. . .'बाप्तिस्मा'चा म्हणजे स्नानोत्तर दीक्षा देण्याचा विधीसुद्धा ख्रिस्तापूर्वीच प्रचारात होता; आणि दूरदूरच्या देशी धर्मोपदेशक पाठवून धर्मप्रसार करण्याची पद्धत बौद्ध भिक्षूंनी पूर्णपणे स्वीकारली होती. . .अलेक्झांडरच्या वेळेपासून पुढे आणि अशोकाच्या वेळी (म्हणजे ख्रिस्तापूर्वी अडीचशे वर्षे) तर खासच – बौद्ध यतींचा प्रवेश पूर्वेकडे इजिप्तमधील अलेक्झांड्रिया व ग्रीस देश येथपर्यंत झाला होता, असे इतिहासावरून सिद्ध होते. अशोकाच्या एका शिलालेखातच असे लिहिले आहे की, त्याने यहुदी लोकांच्या व सभोवारच्या देशांचा ग्रीक राजा जो आंटिओकस त्याशी तह केला होता. तसेच ख्रिस्त जन्मला तेव्हा पूर्वेकडील काही ज्ञानी पुरुष जेरूशलेम येथे गेलेले होते असे बायबलातही वर्णन आहे. (माथ्यू २.१) . . .ख्रिस्ताच्या वेळी हिंदुस्थानातला एक यती तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर व अलेक्झांड्रियाच्या आसपास दरवर्षी येत असे. असे प्ल्यूटार्क याने स्वच्छ लिहिले आहे. यहुदी लोकांत संन्यासयुक्त भक्तिपर ख्रिस्ती धर्माचा प्रादुर्भाव होण्यास बौद्धधर्मच विषेश कारणीभूत झाला असावा असे सहज निष्पन्न होते. इंग्रजी ग्रंथकार लिली याने हेच अनुमान केलेले असून, त्याच्या पुष्टीकरणार्थ फ्रेंच पंडित मिल बर्नुप व रोस्नी यांची तत्सदृश मते त्याने आपल्या ग्रंथात दाखल केली आहेत, आणि जर्मन देशात लेप्पिक येथील तत्त्वज्ञानशास्त्राचे प्रो. सेडन यांनी हेच मत प्रतिपादिले आहे. ख्रिस्त आपल्या बाराव्या वर्षापासून तीस वर्षांचा होईपर्यंत काय करीत होता, याबद्दल बायबलात काहीच माहिती मिळत नाही. नेपाळातील एका बौद्ध मठातील ग्रंथात येशू त्या वेळी हिंदुस्थानात आला होता व तेथे त्यास बौद्ध धर्माचे ज्ञान झाले, असे स्पष्ट म्हटले आहे. निकोलोस नोटोव्हिश या नावाच्या एका रशियन गृहस्थास हा ग्रंथ उपलब्ध होऊन

त्याचे त्याचे भाषांतर १८९४ साली फ्रेंच भाषेत प्रसिद्ध केले आहे. सदर ग्रंथ खरा असो वा प्रक्षिप्त असो . . . ख्रिस्तास नाही तर निदान नव्या करारातील त्याचे चरित्र लिहिणाऱ्या त्याच्या भक्तास तरी बौद्ध धर्माची माहिती असणे असंभवनीय नव्हते (रमेशचंद्र दत्तकृत History of Civilization पहा) मीमांसकांचा नुसता कर्ममार्ग, जनकादिकांचा ज्ञानयुक्त कर्मयोग (नैष्कर्म्य), उपनिषत्कारांची व सांख्यांची ज्ञाननिष्ठा व संन्यास, चित्तनिरोधनरूपी पातंजलयोग, आणि पांचरात्र किंवा भागवतधर्म म्हणजे भक्ती, ही सर्व धार्मिक अंगे व तत्त्वे मुळात प्राचीन वैदिक धर्मातील आहेत . . . पैकी चित्तनिरोधनरूप योग व कर्मसंन्यास या दोन तत्त्वांच्या आधारे बुद्धाने आपला संन्यासपर धर्म प्रथम उपदेशिला होता; पण त्यातच पुढे भक्ती व निष्काम कर्म यांची भर घालून बुद्धाच्या अनुयायांनी बुद्धधर्माचा चोहोकडे प्रसार केला. अशोकाच्या वेळी बौद्ध धर्माचा अशा रीतीने प्रसार झाल्यानंतर शुद्ध कर्मपर यहुदी धर्मात संन्यासमार्गाची तत्त्वे शिरण्यास सुरुवात झाली व अखेर त्यालाच भक्तीची जोड देऊन ख्रिस्ताने आपला धर्म प्रवृत्त केला आहे. इतिहासावरून निष्पन्न होणारी ही परंपरा पाहिली म्हणजे आत्मौपम्य दृष्टीची, संन्यासाची, निर्वैरत्वाची किंवा भक्तीची जी तत्त्वे बायबलच्या नव्या करारात आढळून येतात, ती परंपरेने वैदिक धर्मातून घेतलेली असण्याची बहुतेक खात्री आहे."

लो. टिळकांच्या नंतर अलिबागचे श्री. श्रीधर गणेश मणेरीकर आता पुढे सरकले आहेत. ते आपल्या १४ फेब्रुवारी १९७४च्या पत्रातून कळवितात की, "गीता व बायबल एकच होत असे आम्ही आग्रहाने आजवर प्रतिपादीत आहोत याचा अर्थ गीतेचे बायबलमध्ये शब्दशः भाषान्तर केले आहे, असे आम्ही सांगत नाही. पण बायबलमध्ये गीतातत्त्वे, गीतावचने, गीताश्लोकच देशकालवर्तमानपरिस्थितीनुसार व भाषाभेद-वाक्प्रचार-भेदानुसार पॅरेबल्स, प्रॉव्हर्बस, रिडल्स् यांच्याद्वारे इजिप्त-पॅलेस्टाईनमधील लोकांना आपल्या भारतीय आर्यप्रचारकांनीच शिकवली आहेत. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही आमच्या पूर्वजांची वेदकालीन प्रतिज्ञा आहे. 'वासुदेवः सर्वमिति' या गीताधर्माला कृष्णधर्म मानण्यात येई. यशोदेचा कृष्ण याचेच अपभ्रष्ट उच्चार येशू ख्रिस्त होत. अंबासडर कॉलेजचे प्रकाशन 'व्हॉट इज् दि ट्रू गॉस्पेल ?' या ग्रंथावरून वरील सर्व विधानांचा खरेपणा पटतो."

वरीलसारख्या विधानांवरून, गीतेची प्रतिबिम्बात्मक छाया बायबलमध्ये उमटलेली आहे, एवढाच निष्कर्ष पदरात पडतो. त्यामुळेच कदाचित् बायबल आणि गीता हे दोनच धर्मग्रंथ अनेकानेक टीकाभाष्यांचे विषय होऊन बसले; आणि भक्ती, ज्ञान, कर्म या तीनपदरी यज्ञोपवीताचीच चर्चा मुख्यत्वेकरून त्या टीकाभाष्यातून झाली. अर्थातच मग गीता ही कर्मठ, चातुर्वर्ण्यव्यवस्था मानणाऱ्या कट्टरांसाठीच सांगितली आहे हा प्रवादही त्यातून जोराने उठविण्यास गीताविरोधकांनी कमी केले नाही ! त्याचे निवारण लोकमान्यांच्या गीतारहस्यातून झाल्याशिवाय राहिले नाही. लोकमान्य म्हणतात की, "गीतेतील नीतिधर्म केवळ चातुर्वर्ण्यमूलक आहे

असे जे कित्येकांचे म्हणणे आहे ते खरे नव्हे, हे लक्षात ठेवले पाहिजे. समाज हिंदूंचा असो वा म्लेंच्छांचा असो, प्राचीन असो वा अर्वाचीन असो, पौरस्त्य असो वा पाश्चिमात्य असो, त्यात चातुर्वर्ण्यव्यवस्था असेल तर त्याप्रमाणे किंवा दुसरी समाजव्यवस्था अमलात आल्यास त्याप्रमाणे जे काम आपणास प्राप्त झाले अथवा शक्य असल्यास आपल्या अभिरूचीप्रमाणे आपण कर्तव्य म्हणून पत्करले, तेच आपला स्वधर्म बनते. तो धर्म सोडून कोणत्याही सबबीवर आयत्या वेळी कोणी दुसऱ्याचे काम करू लागणे, हे धर्मदृष्टचा व सर्वभूतहितदृष्टचा गर्ह्य होय, असे गीता सांगत आहे. स्वधर्मात मरण आले तरी श्रेयस्कर या गीतावचनाचे हेच तात्पर्य होय" (गीतारहस्य पृ. ४९२)

म्हणून श्रीमद्‌भगवद्‌गीता हा भारतीय वैदिक धर्माचा ग्रंथ असला तरी तो जगातील कित्येकांचें श्रद्धास्थान आहे. या ग्रंथाला जगाच्या वाङमयांतही तोड नाही. योगी अरविंदांचा Essays on the Geeta हा ग्रंथ जसा अभ्यसनीय तसाच गीतेसंबंधी लो. टिळकांचा गीतारहस्य हा ग्रंथही. त्याच्या अभ्यासाने कळते की योगीराज कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग अशा गीता आत्मसात् करण्याच्या तीन पायऱ्या मानातात तर लोकमान्य कर्मयोग हा गीतेचा आत्माच मानतात. तरीही गीतेचे प्रवृत्तिवादी नीतिशास्त्र सायुज्यमुक्ती वा अमृतत्व हीच मानवी जीवनाची सफलता मानते. त्याच दृष्टीने गीतेचा आदर्श-पुरुष स्थितप्रज्ञ (अ.२), कर्मातीत (अ.४), भक्त (अ.१२), त्रिगुणातीत (अ.१४) व ज्ञानी (अ.१३) इतक्या तऱ्हांनी वर्णिलेला "आत्मन्येवात्मना तुष्ट" आहे. त्याने विहित कर्म कर्तृत्वाहंकार टाकून फलाची आसक्ती सोडून सर्वभूतहित-रतीने केले म्हणजे त्याच्याकडून सर्वेश्वराची पूजा होते व त्याला सिद्धि मिळते ( गी. अ. १८ ) यावरून श्रीमद्‌भगवद्‌गीता माणसाला चित्तांत आत्मतत्व बिंबवून घेऊन ब्रह्मरूप होण्याचा सत्पथ दाखवते हे सूर्यप्रकाशापेक्षाहि स्पष्ट आहे.

गीताधर्म हाच विश्वधर्म म्हटला जातो तो याच दृष्टिकोनातून. एरवी, बायबलादि अनेकानेक ग्रंथांवर गीतेची छाया घनदाट असली, अगर एका धर्मातील प्रथाप्रणालींचा वीट येऊन दुसरा धर्म स्थापन झाला असला तरी प्रचलित सर्व धर्मांच्या सहकार-समन्वयाच्या योगाने अगदीच नवा उभारण्यात येणारा धर्म जग स्वीकारील आणि त्या विश्वधर्माचा प्रमाणग्रंथ भगवद्‌गीता होईल, असे कोणी मानीत असेल तर त्याचा तो कल्पनाविलास वैमानिक झेपेच्या भरारीसारखा अद्‌भुतरम्य असला तरी अजून तरी व्यवहारक्षम नाही. स्वामी विवेकानंदांनी आपल्या 'वेदान्ता' वरील व्याख्यानात स्पष्टच म्हटले आहे की, ' जर खरोखरच कधी पृथ्वीच्या पाठीवरील लोक एकाच धर्माचे अनुयायी होऊन एकाच मार्गाने चालू लागतील, तर ती मोठी खेदाचीच गोष्ट होय, असे म्हणावे लागेल. तसे झाल्यास लोकांची स्वतंत्र विचारशक्ती आणि खराखुरा धर्मभाव सपशेल नष्ट होऊन जाईल. विविधताच जीवनाचा आत्मा आहे. एकमेकातील वेगळेपणाच जीवनाचा मूलमंत्र

आहे. हा भेद संपूर्णपणे नाहीसा झाल्यास सृष्टीचा लोप होऊन जाईल. मात्र विभिन्नता आहे म्हणून विरोध असायला हवा असे मुळीच नाही. विविधता आहे म्हणून परस्पर कलह, एकमेकांत भांडणे असली पाहिजेत असे मात्र मुळीच नाही. ईश्वरलाभाचा आपल्याहून वेगळा मार्ग चोखाळणाऱ्या बांधवांचा जे नाश करू इच्छितात, त्यांनी 'पितृत्व परमेश्वराचे आणि बंधुत्व मानवाचे' ही प्रेममय भाषा बोलण्यात अर्थ तरी काय ? कुणी येशूची, बुद्धदेवाची वा महंमदाची – जगातील कोणत्याहि प्रेषिताची उपासना करेनात का, कोणत्याहि धर्माच्या अनुयायांशी आमचे भांडण नाही. जे अनुष्ठान तुम्हाला भगवंताच्या निकट घेऊन जाईल त्याचा आसरा खुशाल घ्या. पण मार्ग वेगळे आहेत म्हणून रणे माजवू नका. आमचा वेदान्तधर्म कुणालाहि वगळू इच्छित नाही. तो सर्वांसच हृदयाशी लावू इच्छितो. असे जीवन जगून दाखवा की ज्यात त्याग, आध्यात्मिकता, तितिक्षा आणि अनंत प्रेम मूर्त झाले आहे. हे सारे गुण असतील तरच तुम्ही धार्मिक. या साऱ्या तत्त्वांचा फैलाव केवळ भारतातच करावयाचा असे नव्हे, साऱ्या जगात ती पसरून द्यावयास हवीत. " हेच त्याग, आध्यात्मिकता, तितिक्षा आणि अनंत प्रेम फैलावण्याचे सूत्र म्हणजे कर्तव्याकर्तव्याच्या व्यामोहात न गुरफटता, विवेकनिश्चित प्राप्त कर्तव्य 'सर्वभूतहिते रत' होऊन जाणीवपूर्वक भक्तिभावाने व कौशल्यपरिश्रमांची प्रमाणबद्धता अचूकपणे साधून सिद्धी मिळविणे, आणि कर्मफलांची अपेक्षा वा आसक्ती न ठेवता ती ईश्वरार्पण करून टाकणे. मानवजातीचे एकत्व व मूलभूत ईश्वरत्व ओळखणे हाच वेदान्त. त्यातील गीतेचे कर्मयोगशास्त्र ते हेच. ते कोणत्याही प्रचलित धर्माच्या अनुयायांनी, कोणत्याहि देशाच्या सुपुत्र-सुकन्यकांनी आणि कोणत्यानी वर्ण-जाति-जमातीत जन्मलेल्यांनी आत्मसात् करण्यासारखेच आहे. तसे जेवढ्या झपाट्याने होईल, तेवढ्या झपाट्याने मानवजातीचा विश्वधर्म – प्रचलित धर्माधर्मांच्या विविधतेतूनहि – मूर्त स्वरूप धारण करील, आणि " सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम् " होऊन "परस्परं भावयन्तः श्रेयः परं " प्राप्त होत राहील. गीताधर्म हा विश्वधर्म होईल, तो केवळ असाच होईल.

प्रत्येक व्यक्तीचेच काही ना काही विशेषत्व असते. प्रत्येकजण आपापल्या मार्गाने उन्नतीकडे जात असतो. स्वतःच्या जन्मसिद्ध प्रवृत्तीचा आसरा घेतल्याशिवाय व्यक्ति जगूच शकत नाही. व्यक्ति-व्यक्तीनी झालेल्या समष्टीच्या बाबतीतहि तेच सत्य आहे. प्रत्येक समष्टीला मानवजातीच्या तरी परमेष्ठीचे जीवन सर्वांगसंपूर्ण करण्यासाठी कोणत्या तरी विशिष्ट व्रताचे पालन करावे लागते. भारतातील व्यष्टि-समष्टि-परमेष्ठीचा जीवनोद्देश आगळाच आहे. समस्तांची आध्यात्मिक शक्ति एकवटून जणू विद्युद्गृहात संरक्षित करणे आणि जेव्हा म्हणून सुयोग येईल, तेव्हा त्या एकवटलेल्या शक्तीच्या लोंढ्याने सारे जग भारून टाकणे, हा भारतीय जीवनाचा आगळा ध्येय-बिंदू आहे. तो गाठणे भारतालाच शक्य आहे. कारण शिवमहिम्न स्तोत्रात म्हटल्याप्रमाणे भारताचा परमेश्वरनिष्ठ विश्वास आहे की, " भिन्नभिन्न पर्वतांतून उगम पावणाऱ्या भिन्नभिन्न नद्या सरळ अगर वाकड्यातिकड्या मार्गाने

वा गतीने वाहत जाऊन अखेर समुद्रालाच मिळतात, त्याप्रमाणे, आपापल्या भिन्न-भिन्न प्रवृत्तींच्या अनुरोधाने माणसे जे भिन्नभिन्न धर्ममार्ग चोखाळतात, ते सरळ वा नागमोडी असले तरी परमेश्वराप्रतच जाऊन पोहोचतात." काबाकडे तोंड करून कोणी गुडघे टेकतो किंवा चर्चमध्ये अगर बौद्धविहारात कोणी उपासना करतो; पण तो जाणता वा अजाणता जगच्चालक एकमेवाद्वितीय प्रभूचीच उपासना करीत असतो. तो जगच्चालक प्रभू आत्म्यांचा अंतरात्मा आहे. या अंतरात्म्याचा प्रतिनिधी म्हणूनच भगवान् श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे की, 'यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति । स बुद्धिमान् मनुष्येषु ।" एवढेच नव्हे तर तो "अद्वेष्टा सर्व-भूतानां मैत्रः करुण एव च ।" असल्याकारणाने मानव्याची धर्मध्वजा तोच अखंडपणे फडकवीत असतो. ही वृत्ती माणसामाणसात बाणविण्याचा आणि माणसाला निष्काम कर्मयोगाचे वळण लावण्याचा "पौरुषं नृषु" या न्यायाने पुरुषार्थ करणे म्हणजेच गीताधर्म हा विश्वधर्म करून सोडणे होय.

"कार्य करा, कार्य करा, जित्या वर्तमानी ।" हाच गीता-धर्माचा अखंड संदेश आहे. तो देणारा भगवान् श्रीकृष्ण मानव-शरीरधारी या नात्याने सर्व प्राप्त आणि विवेकनिश्चित कर्तव्ये बिनचूक करी. पण "करून अकर्ता" असे. त्यामुळेच "आधी केले, मग सांगितले" असा त्याचा उपदेश आहे. फार काय, "आहे तरी सर्वां ठायी । पाहो जाता कोठेच नाही ।।" असा त्याचा रिवाजच असल्या-कारणाने श्रीकृष्ण आपल्यापरी आध्यात्मिक अधिकारानेही युगपुरुषच होता. ऐतिहासिक दृष्टचा रामायणकाळचा युगपुरुष जसा राजा जनक, तसाच महाभारत काळचा युगपुरुष भगवान् श्रीकृष्ण. त्यांनी आपल्या चरित्र-चारित्र्याने दाखवून दिले आहे की मानवी जीवन व त्यास आनुषंगिक असलेली भौतिक जगातील कर्तव्य-कर्मे पार पाडली पाहिजेत, तर ती पार पाडताना मनुष्याने त्या कर्तव्यात आणि भौतिक जगात, जेवढे त्या कर्तव्यांच्या पूर्तीसाठी रममाण होणे अपरिहार्यच असेल, तेवढेच रममाण व्हावे !! आवश्यकतेच्या मर्यादा ओलांडून जो तो आपले अस्तित्व व वैशिष्टच प्रस्थापित करण्याच्या धडपडीत असलेल्या भौतिक व्यवहारात, मनुष्य मर्यादापुरुषोत्तम न होता फाजील गुंतून राहील, तर तो आपल्या कर्तव्यसिद्धीसह स्वताही भोवऱ्यात सापडून कोठे वाहत जाईल, याचा नियमच राहणार नाही. म्हणून दक्षताच दक्षता घेऊन माणसाने जगच्चालक चैतन्यदेवतेशी एकरूप व्हावयाच्या मानवी जीवनातील ध्येयबिंदूवरचे लक्ष चळू न देताच वागले पाहिजे. "जनी चालणे शुद्ध नेमस्त राहो ।" हेच सर्व द्रष्टचांनी, साधुसंतांनी आणि सत्पुरुषांनी सर्वकाळी व सर्वधर्मी वांछिलेले आध्यात्मिक जीवन होय. तेच भगवद्गीतेत श्रीकृ-ष्णांनी तऱ्हातऱ्हांनी व सूचना-संकेतांनी व्यक्तविले आहे. "मनाच्या अंतःशान्तीवर सर्व ज्ञानाचा भर असतो. जो हे सर्व विश्व व्यापून आहे, तो आत्म्या-आत्म्यातील अंतरात्मा आहे. त्याला मी प्रणिपात करताकरताच मी स्वतःच अंतरात्म्याशी एकरूप होतो. तो अंतरात्माच मी आहे, याची पक्की जाणीव होणे हेच खरे म्हटले

तर ज्ञान किंवा साक्षात्कार होय. जगच्चालक सर्वशक्तिमान चैतन्यदेवाला मूर्ती नाही, पण तो " स्थिरचर व्यापुनि अवघें " दशांगुळे उरला असल्यामुळे प्रत्येक मूर्तीत आहेच आहे, यात शंकाच नाही. म्हणून मी तोच आहे, ही जाणीव रोमरोमी मुरल्यावर, कोणताही विचार, कसलाही शब्द, कसलीही आवश्यकता मला बद्ध करू शकत नाही. मी इंद्रियातीत आहे. मी ज्ञान आणि शाश्वत शांती आहे. अस्ति-नास्ति असे मला काहीच नाही, " हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना सचराचर । आपणचि जाहला ।। " तो मी आहे. सगळे सापेक्ष भाव येथे ढासळून गेलेच पाहिजेत; जाती, जन्म, देव, धर्म या व अशा साऱ्या भेदभावी कल्पना लुप्तच झाल्या पाहिजेत. मग 'आहे' व 'व्हावयाचे' अशा कल्पनाविहाराला वावच आहे कोठे? द्वैताद्वैताची भाषासुद्धा येथे बंद ! सर्व विश्वच तो प्रभू. दुसरे आहेच कोठे? तर मानवी जीवन पवित्र करण्यासाठी कोणत्याही योगसाधनेची भाषा तरी काढण्याची यातायात का? मानवी जीवन स्वभावतःच पवित्र आहे. माणसाने फक्त याचा प्रत्ययबोध किंवा साक्षात्कार घ्यावयाचा आहे " ही स्वामी रामतीर्थांची अवस्था निर्माण होईपर्यंत निष्काम कर्मयोगाची प्रणाली माणसाने अंगवळणी केली पाहिजे.

तसे केले तर अंतरात्म्याचा अखंड साक्षात्कार हीच खरी स्वतंत्रता, हाच खरा जीवनमोक्ष. आपल्या प्राप्त व विवेकनिश्चित कर्तव्यकर्मात गढून जाऊन पण फलानासक्त राहून माणसाला जीवन्मोक्ष मिळवता येतो. कर्तव्य हे कर्तव्य म्हणूनच करीत राहिले तर त्यातूनच आत्मज्ञान वा साक्षात्कार होतो व त्याचे पर्यवसान सर्वतंत्रस्वतंत्रतेत आणि मोक्षात व्हावयास चुकत नाही. कर्तव्यकर्म चुकवणे किंवा त्यात अंगचोरपणा करणे हे पाप असून अनासक्त कर्तव्यकर्माचरण हा सर्वेश्वरपूजनाचा महान् यज्ञ आहे. गीतेने केलेल्या जीवनोपदेशाचे सुटसुटीत स्वरूप हे असे आहे.

भगवान् श्रीकृष्णांनी आखून दिलेल्या राजपथाने जाणारा धर्माचा रथ तेजस्वीपणाने आपली वाटचाल करीत असतो. अनासक्तपणे कर्तव्यकर्म करणारा समाजाचे, राष्ट्राचे, मानवजातीचे ऐहिक सुखवर्धन करीत राहूनही स्वतः वृत्तीने संन्यासीच ठरतो. त्याच्या " कर्ता होऊनहि अकर्ता " राहण्याने, तो परमेश्वराशीच समरस राहतो. जग व त्याच्या चालचलणुकी यांचा नि त्याच्या ध्येयधोरणाचा पुरेपूर साक्षात्कार होऊनही " कार्य करा, कार्य करा, जित्या वर्तमानी । " हा गीतेचा आदेश तो पाळत गेला, तर त्या भक्ताला " लोकांच्या सुखी सुखावे " हे सहजच घडते. हे वैचित्र्यपूर्ण विश्व निर्माण करणाऱ्या परमेश्वराची इच्छामात्र आज्ञा, स्वतःच्या विचार-उच्चार-आचारांना प्रेरक होणारे सत्य, जे जे काही आपल्या हातून घडेल वा घडते ते ते परमेश्वरपूजा म्हणून समर्पण करणारी भक्ती, शरीर-वाणी-मनाला संयम राखणारा विनय, प्रेरणाभावनादिकांचे सुंदर उदात्तीकरण करणारी हृदयाची व मेंदूची विशालता इत्यादि लक्षणांनीच कर्तव्यरत भक्ताचा धर्म प्रतीत होत असतो. हा धर्म विशिष्ट मंत्रतंत्रांचा आधार, आग्रह अगर परंपरा नसून " सत्यं, शिवं, सुंदरं " एढेच त्याच्या मूल्यमापनाचे प्रमाण आहे. भारतीय

संस्कृतिनिष्ठ आणि भारताचे प्राचीन ऋषिमुनी "सत्यं, शिवं, सुंदरं"च्या कसोटी-साठीच जगले आणि प्रसंगी प्राणावरही उदार झाले. भारतीय जीवनाचा राष्ट्रीय दृष्टिकोन "सत्यं, शिवं सुंदरं" या शब्दत्रयातच आहे.

"संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ।" असले तरी "तयोस्तु कर्मसंन्या-सात् कर्मयोगो विशिष्यते ।।" हे गीतेने ठासून सांगितले आहे. संन्यासी आणि कर्म-योगी आपापल्यापरी श्रेष्ठ असले तरी संन्यासी आणि कर्मयोगी यांच्या वृत्तिप्रवृ-त्तींचा प्रीतिसंगम जो साधू शकतो, तो आपल्या जीवनाला तीर्थक्षेत्रच बनवतो. निसर्गाची सत्ता जोपर्यंत अबाधित आहे, तोपर्यंत "न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।" मग, वर्तमान-वास्तवातील चैतन्यमय जीवनाशी सर्वस्वी मिळून गेले नाही, तरी मिळतेजुळते घेणे हे ओघानेच येते. चराचरातून जर सर्वत्र परमा-त्माच संचारला आहे, तर "सर्व खलु इदं ब्रह्म।" हे उघडच आहे. खोलवर अंतर्दृष्टीने त्याचा साक्षात्कार सर्वांसच सुलभ आहे. त्यासाठी तितिक्षेने पुष्कळ वेळा प्रयोगशरणही व्हावे लागेल. तरी पण "प्रयत्नांती परमेश्वर" सापडल्याशिवाय राहणार नाही. तो तसा सापडूनहि "वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः।" एकादाच भक्त प्रल्हादासारखा निघावयाचा हा गीतेचा अनुभव काही खोटा ठरणार नाही.

भारतीय संस्कृतीने जगाच्या विचारधनात "वासुदेवः सर्वमिति' ही जी भर घातली आहे, ती आचरणशुद्ध ऋषींच्या स्वयंशासित अशा क्षणाकणांच्या उपयुक्तता-वादाने घातली आहे. प्रचवनापेक्षा प्रवर्तन प्रमाण ठरते. ज्ञानी आणि कृतिशूर माणसाकडूनच जनसामान्याला कित्ता घालून मिळत असतो. म्हणून वैयक्तिक दृष्टचा समाजाचा घटक या नात्याने, शहाण्या माणसाला आपल्या जबाबदारीत व कर्त-व्यात कसूर करून चालत नाही. जित्याजागत्या वर्तमानात विवेकनिश्चित कर्तव्य पार पाडीत असतानाच, "धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि" अशा भगवंताच्या वच-नाचा अनुभव घेऊनच, धर्मार्थकाममोक्ष हे पुरुषार्थ ज्ञानी मनुष्य संपादीत असतो. या पुरुषार्थसाधनेत योग, ध्यान, जप, तप, स्वाध्याय, चित्तशुद्धी इत्यादि अनेक उपाय असले तरी ज्ञान, कर्म आणि भक्ति यांच्याइतके आगळे महत्त्व दुसऱ्या कशासच नाही. "एकं सांख्यं च योगं च यः पश्चति स पश्यति।" या गीतावचनाच्या समन्वय-पद्धतीने ज्ञानसंपन्न, भक्तिपूर्ण कर्मयोग हे गीतारहस्य म्हणून लोकमान्य टिळकांनी जगाला जीवनदर्शन दिलेले आहे. त्याच्याच अनुषंगाने आणि स्वामी रामकृष्ण परमहंस यांचा अनुभव जमेस धरून "एकं ब्रह्म च शून्यं च" या विचारविकासा-कडील प्रवृत्ती वैदिक धर्म व बौद्ध धर्म यांच्या समन्वयसहकारांची आचारसंहिता आखण्याच्या खटाटोपातही आहे. "सर्वधर्मी समानत्व" हा त्या आणि तसल्या खटाटोपांचा पाया आहे. त्यांना यश आले तरी आणि न आले तरी, मानवी जीवना-तील जित्याजागत्या वर्तमानाचे वास्तव स्वच्छपणे लक्षांत घेऊन विवेकनिश्चित कर्तव्य निःस्वार्थपणेच व अनासक्त होऊनच पार पाडीत राहावयाचे हा गीतेने दाख-

विलेला राजपथ सोडून उपयोग नाही. त्या राजपथावरून जी पावले टाकावयाची ती नवव्या अध्यायात "सततं कीर्तयन्तो मां (ईश्वरं), यतन्तश्च दृढव्रताः।। नमन्तश्च मां (ईश्वरं) भक्त्या नित्ययुक्ता उपासते।।" या श्लोकांत गीतेने स्वच्छ स्वच्छ सुचविली आहेत.

ही वाटचाल करताना गीतारहस्यात सांगितल्याप्रमाणे "केवळ कर्तव्य म्हणून परमेश्वरार्पणबुद्धीने सर्व सांसारिक कर्मे करीत राहून तद्द्वारा परमेश्वराचे यजन किंवा उपासना आमरणान्त चालू ठेवण्याचा जो गीतेतील ज्ञानयुक्त प्रवृत्तिमार्ग किंवा कर्मयोग" (गीतारहस्य पृ. ४९४) तो सर्व काली, सर्व देशांत आणि सर्व लहान-थोरांस आचरणशुद्ध सांभाळता येण्यासारखाच आहे. गीतेतील धर्मात एक प्रकारचा जिवंतपणा, तेज किंवा सामर्थ्य आहे. वैदिक धर्म घ्या, बुद्धाचा धर्म घ्या, किंवा ख्रिस्ताचा धर्म घ्या वा महंमदाचा धर्म घ्या, जगाचे धारणपोषण होऊन मनुष्याला अखेर सद्गती मिळावी हाच सर्वांचा मुख्य हेतू असल्यामुळे सम म्हणजे वर्णाचा, ज्ञातीचा, देशाचा, प्रार्थनोपासना-पद्धतीचा किंवा दुसरा कोणताच भेद न ठेवता सर्वांना एकाच मापाने एकच सद्गती देणारा आणि "धारणाद्धर्म इत्याहुः धर्मो धारयते प्रजाः।" याचा प्रत्यय आणून देणारा, ज्ञान-भक्ती-कर्म-समन्वयी असा तो गीताधर्मच विश्वव्यापी मानवधर्माचे अमृत ठरणारा आहे. गीताधर्म हा विश्वधर्म आहे तो असा आहे. "यासाठी भक्तीची, ब्रह्मज्ञानाची व कर्तृत्वाची जोड घालून देणाऱ्या या सम आणि [illegible]री गीताधर्माने परमेश्वराचे यजन-पूजन करणारे-सत्पुरुष उत्पन्न होवोत" [illegible]लोकमान्यांच्याच शब्दांनी प्रार्थना आहे, त्या जगताच्या अंतरात्म्याला, जो शैवांच[illegible] आहे, वैष्णवांचा विष्णू आहे, कर्मी गणांचे कर्म आहे. बौद्धांचा बुद्ध आहे, जैनांचा जिन आहे, ख्रिस्तांचा व यहुद्यांचा जिहोवा आहे, मुसलमानांचा अल्लाह आहे, वेदांत्यांचे ब्रह्म आहे, सर्वधर्मातील सर्व पंथांचा व संप्रदायांचा ईश्वर आहे. स्वार्थाकडे घेऊन जाणारे सर्व ऐहिक पाश तोडून, आसक्तीचा त्याग करून केवळ समाजाच्या व राष्ट्राच्या कल्याणाचे आणि मानवजातीच्या आध्यात्मिक उन्नतीचे उदात्त व्रत शिकविणारा गीताधर्म हा बाह्य विधि व अनुष्ठाने यांच्यात साठविलेला नसून दुःखितांना व पीडितांना मनःशांती व दिलासा देणारा, अन्यायाचे व दुरितांचे निवारण करून सज्जनांना निर्धास्त करणारा, आणि स्वास्थ्य, संघटना आणि सामर्थ्य सांभाळून सतत समाजाला रसरशीत व तेजस्वी जीवन देणारा तो धर्म आहे. त्याचा सर्वत्र फैलाव व विजय झाला म्हणजेच गीताधर्म हा विश्वधर्म म्हणून इतिहासमान्य होईल.

◆ ◆ ◆

---

केसरी मुद्रणालय, पुणें ३०